प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मार्च 13, 2019

**लखनौ युनिव्हर्सिटी प्रायमरी को-ऑपरेटिव बँक लि., लखनौ (युपी) हयांचेवर आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46 (4) सह वाचित कलम 47 अ (1)(क) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन भारतीय रिझर्व बँकेने, लखनौ युनिव्हर्सिटी प्रायमरी को-ऑपरेटिव बँक लि., लखनौ (युपी) हयांना रु.1,00,000/- (रुपये एक लाख) दंड लागु केला असून, हा दंड, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 36 (1) खाली दिलेल्या पर्यवेक्षणीय सूचना हयांच्याशी संबंधित आरबीआयच्या सूचना/मार्गदर्शन तत्वे हयांचे उल्लंघन केले गेल्याने लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. हया प्रकरणातील सत्य, त्या बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणी विचारात घेऊन भारतीय रिझर्व बँकेने निर्णय घेतला की, उल्लंघने सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अनिरुध्द डी. जाधव**
सहाय्यक व्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/2166**